# भारतातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची सद्यस्थिती

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

**संशोधक विद्यार्थी**

ऋषिकेश सर्जेराव अंबुरे.

समाजशास्त्र विभाग.

**संशोधन मार्गदर्शक**

डॉ. विठ्ठल भीमराव मातकर

सहाय्यक प्राध्यापक,

समाजशास्त्र विभाग प्रमुख,

प्रमिलादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालय,

नेकनुर, जि. बीड.

**गोषवारा**:

भारतीय कृषी क्षेत्रामध्ये लहान व सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे असल्यामुळे उत्पादन, निविष्ठा खरेदी, साठवणूक, प्रक्रिया, वाहतूक आणि बाजारपेठेतील विक्री या बाबतीत शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या समस्यांवर सामूहिक पद्धतीने मात करण्यासाठी शेतकरी उत्पादक संघटना (Farmer Producer Organisations–FPOs) आणि शेतकरी उत्पादक कंपन्या (Farmer Producer Companies–FPCs) महत्त्वपूर्ण संस्थात्मक माध्यम म्हणून विकसित झाल्या आहेत. भारत सरकारने 2020 मध्ये 10,000 Farmer Producer Organisations (FPOs) स्थापन व प्रोत्साहन देण्याची केंद्रीय क्षेत्र योजना सुरू केली. मार्च 2026 पर्यंत या योजनेंतर्गत 10,000 FPOs नोंदणीकृत झाल्या होत्या. त्यापैकी 1,175 FPOs मध्ये 100 टक्के महिला सदस्य आहेत आणि 23.55 लाख महिला शेतकरी या योजनेत सहभागी आहेत. ऑगस्ट 2026 मधील अधिकृत माहितीनुसार या FPOsची एकत्रित उलाढाल 31 जुलै 2026 रोजी ₹20,358 कोटी होती. 5,765 FPOsकडे स्वतःची प्रक्रिया केंद्रे असून 3,083 FPOsनी Credit Guarantee सुविधेचा लाभ घेतला आहे. या संशोधन पेपरमध्ये भारतातील FPO/FPC चळवळीची सद्यस्थिती, आर्थिक व सामाजिक भूमिका, बाजारव्यवस्थेतील योगदान, प्रमुख समस्या आणि भविष्यातील शक्यता यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**महत्त्वाचे शब्द:**

शेतकरी उत्पादक कंपनी, FPO, FPC, कृषी विपणन, मूल्यसाखळी, सामूहिक शेती, ग्रामीण विकास, शेतकरी सक्षमीकरण.

**प्रस्तावना:**

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये कृषी क्षेत्राला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. मात्र, भारतीय शेतकऱ्यांमध्ये लहान व सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण मोठे असल्याने त्यांना कृषी उत्पादनाच्या विविध टप्प्यांवर अडचणी येतात. कमी उत्पादनाचे प्रमाण, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढ-उतार, मध्यस्थांची भूमिका आणि बाजारपेठेची अपुरी माहिती यामुळे शेतकऱ्यांची सौदेबाजी क्षमता मर्यादित राहते. या परिस्थितीत शेतकऱ्यांनी सामूहिक स्वरूपात संघटित होऊन उत्पादन व विपणन करण्याची गरज निर्माण झाली. शेतकरी उत्पादक कंपनी ही त्याच गरजेची संस्थात्मक पूर्तता करणारी रचना आहे. FPCच्या माध्यमातून शेतकरी निविष्ठांची सामूहिक खरेदी, उत्पादनाचे एकत्रीकरण, प्रतवारी, साठवणूक, प्रक्रिया, पॅकिंग, ब्रँडिंग आणि सामूहिक विक्री करू शकतात. भारत सरकारची 10,000 FPO योजना शेतकऱ्यांचे संघटन करून त्यांना कृषी मूल्यसाखळीशी जोडण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या योजनेंतर्गत FPOsना व्यवस्थापन खर्च, Equity Grant, Credit Guarantee, प्रशिक्षण आणि बाजारपेठीय जोडणी यांसारख्या सुविधा दिल्या जातात.

**संशोधन पद्धती:**

सदर संशोधन हे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचे असून दुय्यम माहितीवर आधारित आहे. 2026 पर्यंत उपलब्ध अधिकृत आकडेवारीच्या आधारे FPO/FPCची सद्यस्थिती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1. भारतातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची सद्यस्थिती अभ्यासणे.

3. शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या आर्थिक भूमिकेचे विश्लेषण करणे.

4. कृषी बाजारपेठेतील FPCच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

5. FPCमुळे होणारे सामाजिक-आर्थिक बदल समजून घेणे.

6. FPCसमोरील प्रमुख समस्या ओळखणे.

**भारतातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची सद्यस्थिती:**

भारत सरकारच्या 10,000 FPO योजनेअंतर्गत 1 मार्च 2026 पर्यंत 10,000 FPOs नोंदणीकृत झाल्या. त्यापैकी 1,175 FPOs पूर्णपणे महिला सदस्यांच्या आहेत. या योजनेंतर्गत 23.55 लाख महिला शेतकरी सहभागी असल्याचे केंद्र सरकारने मार्च 2026 मध्ये संसदेत सांगितले.

**तक्ता 1 : FPOची निवडक सद्यस्थिती**

| अ. क्र. | निर्देशक | **उपलब्ध स्थिती** |
|---|---|---|
| १) | योजनेंतर्गत FPO १०,००० | १०,००० |
| २) | १००% महिला सदस्य असलेल्या FPOs | १,१७५ |
| ३) | महिला शेतकरी सदस्य | २३.५५ लाख |
| ४) | स्वतःची Processing Units असलेल्या FPOs | ५,७६५ |
| ५) | Credit Guarantee घेणाऱ्या FPOs | ३,०८३ |
| ६) | ३१ जुलै २०२६ पर्यंत एकत्रित उलाढाल | ₹ २०,३५८ |

वरील आकडेवारीवरून FPO क्षेत्राचा केवळ संख्यात्मक विस्तार झालेला नसून त्याच्या व्यावसायिक क्षमतेतही वाढ होत असल्याचे दिसून येते.

**FPOची आर्थिक कामगिरी:**

2024-25 च्या लेखापरीक्षित आर्थिक विवरणानुसार योजनेंतर्गत FPOsमध्ये आर्थिक कामगिरीत मोठी विविधता आढळते. 6,964 FPOsची उलाढाल ₹50 लाखांपर्यंत, 862 FPOsची उलाढाल ₹50 लाख ते ₹1 कोटी आणि 1,135 FPOsची उलाढाल ₹1 कोटीपेक्षा अधिक होती.

**तक्ता 2 : FPOनिहाय उलाढाल**

| अ.क्र. | उलाढालीचा स्तर | FPOs ची संख्या |
|---|---|---|
| १) | ५० लाखांपर्यंत | ६,९६४ |
| २) | ₹ ५० लाख -₹१ कोटी | ८६२ |
| ३) | ₹१ कोटीपेक्षा जास्त | १,१३५ |

या आकडेवारीवरून FPO च्या व्यवसायिक विकासात असमानता दिसून येते. काही FPOs सक्षम कृषी-व्यवसाय संस्था म्हणून पुढे जात असताना अनेक FPOs अजूनही प्राथमिक विकासाच्या टप्प्यात आहेत.

**FPCची कृषी मूल्यसाखळीतील भूमिका**

शेतकरी उत्पादक कंपन्या कृषी मूल्यसाखळीतील विविध टप्प्यांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

उत्पादन → संकलन → प्रतवारी → साठवणूक → प्रक्रिया → पॅकिंग → ब्रँडिंग → विपणन → ग्राहक

FPOsना कृषी निविष्ठा, उत्पादन संकलन, व्यापार, प्रक्रिया, मूल्यवर्धन, बियाणे उत्पादन आणि डिजिटल बाजारपेठांशी जोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. 2025 च्या अधिकृत माहितीनुसार 4,642 FPOs e-NAMशी जोडल्या गेल्या होत्या. तसेच FPOsना ONDC व GeMसारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांना पारंपरिक स्थानिक बाजारपेठेपेक्षा व्यापक बाजारपेठेत प्रवेश मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**सामाजिक-आर्थिक भूमिका:**

शेतकरी उत्पादक कंपन्या (FPC) या केवळ शेतमालाच्या खरेदी-विक्रीसाठी कार्य करणाऱ्या संस्था नसून ग्रामीण समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाला चालना देणाऱ्या महत्वपूर्ण संस्था आहेत. विशेषतः लहान व सीमांत शेतकऱ्यांना संघटित करून त्यांच्या सामूहिक शक्तीचा उपयोग करण्याचे कार्य FPC करते. FPCचा प्रभाव केवळ आर्थिक व्यवहारापुरता मर्यादित नसून त्याचे सामाजिक परिणामही महत्त्वाचे आहेत.

**शेतकऱ्यांची सौदेबाजी क्षमता:**

वैयक्तिक शेतकऱ्याऐवजी मोठ्या प्रमाणात उत्पादन एकत्रित केल्यास खरेदीदारांशी अधिक प्रभावीपणे वाटाघाटी करता येतात.

**उत्पादन खर्चात बचत:**

शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या माध्यमातून निविष्ठांची सामूहिक खरेदी, कृषी यंत्रसामग्रीचा सामायिक वापर, वाहतूक व्यवस्थापन आणि तांत्रिक मार्गदर्शन यांमुळे सभासद शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चात बचत होण्याची शक्यता निर्माण होते. त्यामुळे FPC ही शेतकऱ्यांच्या आर्थिक सक्षमीकरणाबरोबरच ग्रामीण सामाजिक परिवर्तनाचे महत्वपूर्ण माध्यम ठरते. निविष्ठांची सामूहिक खरेदी केल्यामुळे मोठ्या प्रमाणात खरेदीचे फायदे मिळू शकतात.

**मूल्यवर्धन**:

प्रक्रिया, पॅकिंग आणि ब्रँडिंगमुळे शेतमालाला अधिक मूल्य प्राप्त करण्याची संधी निर्माण होते.कच्च्या शेतमालाऐवजी प्रक्रिया केलेले किंवा पॅकिंग केलेले उत्पादन बाजारात आणल्यास शेतकऱ्यांना अधिक मूल्य मिळविण्याची संधी निर्माण होते.

**रोजगारनिर्मिती:**

FPCच्या आर्थिक व्यवहारांमुळे वाहतूक, पॅकिंग साहित्य, दुरुस्ती, कृषी यंत्रसामग्री, बाजारपेठ आणि लॉजिस्टिक्स यांसारख्या पूरक क्षेत्रांमध्ये रोजगार निर्माण होतो. उदाहरणार्थ, FPCने मोठ्या प्रमाणावर शेतमाल संकलित केल्यास वाहतूकदार, हमाल, पॅकिंग कामगार आणि स्थानिक सेवा पुरवठादारांची मागणी वाढते.यामुळे ग्रामीण युवकांना गावाजवळच रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.

**महिला सक्षमीकरण:**

1,175 FPOsमध्ये 100 टक्के महिला सदस्य आहेत. प्रत्येक FPOच्या संचालक मंडळात किमान एका महिलेचा समावेश असणे अपेक्षित आहे. यामुळे ग्रामीण महिलांना आर्थिक निर्णय, संस्थात्मक नेतृत्व आणि बाजारव्यवहारात सहभागी होण्याची संधी मिळते.महिला शेतकऱ्यांचा FPOमध्ये सहभाग वाढल्यास त्यांची आर्थिक व सामाजिक निर्णयक्षमता वाढण्यास मदत होत आहे.

**FPCसमोरील प्रमुख समस्या:**

FPOची संख्या वाढली असली तरी त्यांच्या दीर्घकालीन शाश्वततेसमोर अनेक आव्हाने आहेत.

1. कार्यशील भांडवलाची कमतरता
2. व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव
3. प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता
4. सदस्यांचा मर्यादित सहभाग
5. बाजारभावातील अस्थिरता
6. मूल्यवर्धनासाठी आवश्यक पायाभूत सुविधांचा अभाव
7. ब्रँडिंग व विपणनातील अडचणी
8. मोठ्या खरेदीदारांशी सातत्यपूर्ण संबंधांचा अभाव
9. लेखा व संस्थात्मक व्यवस्थापनातील अडचणी
10. काही FPOsचा बाह्य सहाय्यावर अधिक अवलंबून राहण्याचा धोका.

**निष्कर्ष**:

भारतातील शेतकरी उत्पादक कंपन्यांची चळवळ सध्या विस्ताराच्या महत्त्वपूर्ण टप्प्यात आहे. 10,000 FPOsची निर्मिती, ₹20,358 कोटींची एकत्रित उलाढाल, लाखो शेतकऱ्यांचा सहभाग आणि महिलांचा वाढता सहभाग यामुळे या संस्थांना ग्रामीण कृषी अर्थव्यवस्थेत महत्त्व प्राप्त झाले आहे. FPCच्या माध्यमातून शेतकऱ्यांना निविष्ठा खरेदी, उत्पादन संकलन, सामूहिक विक्री, प्रक्रिया, मूल्यवर्धन आणि बाजारपेठीय जोडणीच्या संधी उपलब्ध होतात. तथापि, सर्व FPOs आर्थिकदृष्ट्या सक्षम झालेल्या नाहीत. त्यामुळे पुढील टप्प्यात “FPOची संख्या वाढविणे” यापेक्षा “FPOला शाश्वत आणि नफाक्षम कृषी-व्यवसाय संस्था बनविणे” अधिक महत्त्वाचे ठरेल.

**संदर्भसूची:**


1. Government of India, Ministry of Agriculture & Farmers Welfare. *Formation and Promotion of 10,000 Farmer Producer Organisations–Operational Guidelines.

2. Press Information Bureau, Government of India. *Government Achieves Milestone of 10,000 Farmer Producer Organisations Registered Across the Country,17 March 2026.

3. Press Information Bureau, Government of India. 10,000 Farmer Producer Organisations Formed Under Central Sector FPO Scheme,

4. Press Information Bureau, Government of India. Support for Farmer Producer Organisation, 4 August 2026.

5. Press Information Bureau, Government of India. Formation of Farmer Producer Organizations (FPOs),

6. Press Information Bureau, Government of India.

7. Small Farmers' Agribusiness Consortium (SFAC). Publications and guidelines relating to Farmer Producer Organisations.

8. NABARD. Reports and publications relating to Farmer Producer Organisations and producer institutions.

9. Ministry of Agriculture & Farmers Welfare, Government of India. Reports on agricultural marketing and farmer collectivisation.

10. ICAR. Research literature relating to farmer organisations and collective agricultural marketing.

11. Government of India. Companies Act, 2013—provisions relating to Producer Companies.

12. Government of India. *Agriculture Infrastructure Fund* related policy documents.

13. Government of India. E-National Agriculture Market (e-NAM) related documents.

14. National Academy of Agricultural Sciences. Policy literature on Farmer Producer Organisations.

15. Government of India. Policy documents relating to agricultural value chains and farmer producer organisations.